# मेट्रो-३च्या ३०४ बाधितांना फ्लॅट वाटप

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गिकेवर प्रस्तावित असलेल्या मेट्रो-३ प्रकल्पामध्ये माहीम येथील नयानगरमधील ३२७ प्रकल्पबाधितांपैकी ३०४ प्रकल्पबाधितांना अद्याप सदनिकांचे वाटप करण्यात आले असून उर्वरित प्रकल्प बाधितांनाही लवकरात लवकर सदनिका देण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने (एमएमआरसी) सांगण्यात आले आहे.

एमएमआरसीलानयानगर येथील जमीन मेट्रो-३ प्रकल्पाच्या टनेल बोरिंग मशिनच्या रोपणाकरिता आवश्यक आहे. एकूण ३२७ बाधितांपैकी २९८ घरगुती, तर १८ व्यावसायिक युनिट असून ११ रहिवासी वजाव्यावसायिक युनिट आहेत. या



■ मेट्रो-३ मार्गामध्ये एकूण २ हजार ८०७ बाधितांपैकी १ हजार ८६६ घरगुती, तर ३९ घरगुती वजाव्यावसायिक आणि ७९५ व्यावसायिक युनिट आहेत.

३२७ बाधितांपैकी ३०४ प्रकल्प बाधितांना अद्याप सदनिकांचे वाटप करण्यात आले असून या बाधितांना कुर्ला पश्चिम येथील कुर्ला प्रीमियर येथील सदनिका देण्यात आल्या आहेत, तर व्यावसायिक प्रकल्प बाधितांना गौतमनगर येथील गोवंडी येथे स्थानांतरित केले जाणार आहे. मेट्रो-३ मार्गामुळे एकूण २ हजार ८०७प्रकल्प बाधित झाले असून मेट्रो-३चे बांधकाम सुरू होण्यापूर्वी सर्व बाधितांचे पुनर्वसन करणे ही आमची सामाजिक आणि नैतिक जबाबदारी आहे, असे एमएमआरसीच्या वतीने यापूर्वी सांगितले होते. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेच्या बांधकामाचे पाच कंपन्यांना सात टप्प्यांत काम देण्यात आले आहे. या मार्गाचे बांधकाम या आठवडाभरात सुरु करण्यात येणार असून आता बांधकामापूर्वीची प्रक्रिया सुरु करण्यात आली असल्याचे एमएमआरसीच्या वतीने सांगण्यात आले आहे.